सकाळ



चंदगड : रवळनाथ को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी शाखेच्या वर्धापन दिन कार्यक्रमाला उपस्थित पदाधिकारी व कर्मचारी.

# 'रवळनाथ'च्या चंदगड शाखेचा १६ वा वर्धापन दिन उत्साहात

**सकाळ वृत्तसेवा**

चंदगड, ता. २२ : श्री रवळनाथ को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटीच्या येथील शाखेचा सोळावा वर्धापन दिन साजरा झाला. शाखा अध्यक्षा पुष्पा नेसरीकर व त्यांचे पती निंगाप्पा नेसरीकर यांच्या हस्ते पूजा झाली.

प्राचार्य आर. एस. निळपणकर, प्रा. विजयकुमार घुगरे, महेश मजती, मीना रिंगणे, उमा तोरगल्ली, रेखा पोतदार, शांताराम गुरबे यांच्या हस्ते श्री रवळनाथाच्या प्रतिमेचे पूजन झाले.

निळपणकर म्हणाले, ''संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांचे कुशल नेतृत्व आणि सभासद, ठेवीदार, कर्जदार, शाखा संचालक, सल्लागार यांच्या एकजुटीतून या शाखेने अल्पावधीत कौतुकास्पद कामगिरी केली आहे.'' पुष्पा नेसरीकर यांनी संस्थेच्या प्रगतीचा आढावा घेतला. नारायण काणेकर, ॲड. आर.पी. बांदिवडेकर, ॲड. विजय कडूकर, सचिन नेसरीकर, ॲड. विष्णू पाटील, प्रा. बी. एम. पाटील, शेखर वाली, प्रवीण नेसरीकर, महेश निट्टूरकर, सट्टुप्पा पेडणेकर, सतीश परीट उपस्थित होते. शाखाधिकारी दीपक शिंदे यांनी आभार मानले. प्रा. डॉ. आर. एन. साळुंखे यांनी सूत्रसंचालन केले.

Kolhapur, Gadhinglaj-Today
23/06/2022 Page No. 4